# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ३१.०१.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ३०/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २३९ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १,५५,२००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ३०/०१/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०२ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ११.०७ लिटर दारू असा एकुण ६,५००/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. ३०/०१/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण १,४५०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपघाताचे दाखल गुन्हे:—**

दि. ३०/०१/२०२३ रोजी पोस्टे हटटा येथे कलम ३०४अ,२७९,४२७ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील आरोपीने स्वताच्या ताब्यातील मोसा क्र एमएच २२ ऐ वाय ८७१० हि बेदरकारपणे हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन आडगाव रंजे बसस्थानकावर प्रवाशी उतरणे व चढणेसाठी थांबलेल्या बसला पाठीमागुन जोराची धडक देवुन अंदाजे १००० रू चे नुकसान केले व स्वताचे तसेच सोबत असलेल्या इसमाचे मरणास कारणीभुत झाला आहे म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनीयम १९८८ कायदयान्वये गुन्हा दाखल:—**

दि. ३०/०१/२०२३ रोजी पोस्टे वसमत शहर येथे कलम ७,१२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनीयम १९८८ अन्वयें गुन्हा दाखल असुन यातील नमुद तक्रारदार यांना त्यांचे आईच्या हिश्याला आलेली मौ.वसमत शिवारातील मधील शेती ची कोर्ट आदेशान्वये मोजणी करण्यासाठी ८०,००० रू लाचेची मागनी करून तोडजोडीअंती पडताळणी दरम्याण ५०,००० रू लाचेची मागणी दि. २५.०१.२०२३ रोजी करून स्विकारण्यास सहमती दिली तसेच लोकसेवक यांनी तक्रारदार याचे कडुन त्यांचे आईचे नावावरील शेती मोजणीसाठी ५०,००० लाचेची रक्कम खाजगी यांचे मार्फेत दिनांक ३०.०१.२०२३ रोजी स्विकारून स्वताचा आर्थिक फायदा करून घेण्याचा प्रयत्न केला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**कॉपी राईट ॲक्ट सदरखाली दाखल गुन्हे:—**

दिनांक ३०/०१/२०२३ रोजी पोस्टे हिंगोली ग्रामीण येथे कलम ५१,६३ कॉपी राईट ॲक्ट १९५७ अन्वये गुन्हा दाखल असुन यातील आरोपीतांनी संगणमत करून कॅस्ट्रॉल कंपनीचे आईल त्या बॉटल वरती होलोग्राम व मोनोग्राम याचा वापर करून कॅस्ट्रॅल ॲक्टीव्ही कंपनीचे नावाने आपल्या दुकानामध्ये विक्रीसाठी ठेवुन स्वामीत्वाच्या मुळ हक्काचे उल्लंघन करीत असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली ग्रामीण पोलीस तपास करित आहेत.